**CNR No. :- MHSI100002622021**

## -: <u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३३/२०२१</u> :-

## -: <u>निशाणी ५२ वरील आदेश</u> :-

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज श्री. श्रीकांत लक्ष्मण सावंत यांस साक्षीसमन्स पाठविणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादी यांनी असे कथन केले आहे की, सदर दाव्याचे कामी श्री. श्रीकांत लक्ष्मण सावंत यांची साक्ष अतिशय महत्वाची आहे. सबब, त्यांना तळेखोल, गावठणवाडी, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग येथील पत्यावर साक्षीसमन्स काढण्याची विनंती प्रस्तुत अर्जाद्वारे केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जाकामी प्रतिवादीतर्फे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जाकामी म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुरीस आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, सदर साक्षीदारास तपासण्याचे कारण वादीने प्रस्तुत अर्जात नमुद केलेले नाही.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार वादीने सदर साक्षीदारास तपासण्याचे कारण अर्जामध्ये नमुद केल्याचे दिसुन येत नाही. परंतु, प्रस्तुत अर्जाच्या युक्तीवादा दरम्यान वादीतर्फे विधिज्ञांनी; साठेकरार, संमत्तीपत्र व रक्कम स्वीकारलेच्या पोहोच पावतीवर सदर साक्षीदाराने सही केल्याचे कथन केले. अभिलेखाचे अवलोकन करता, वादी यांनी नि.क्र.४/६ फेरीस्तासोबत वादी व प्रतिवादी यांच्या दरम्याने झालेल्या

साठेकराराची छायांकीत प्रत हजर केलेली आहे. दि.०१.०४.२०११ रोजीच्या सदर साठेकराराचे अवलोकन करता, सदर साठेकरारामध्ये साक्षीदार क्र. १ म्हणुन श्री. श्रीकांत लक्ष्मण सावंत यांचे नाव नमुद असल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे सदर दाव्यातील नि.क्र.४/७ फेरीस्तासोबत हजर केलेल्या संमत्तीपत्राच्या छायांकीत प्रतिवर श्री. श्रीकांत लक्ष्मण सावंत यांनी ओळखीकरीता सही केल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे दि.०७.०२.२०१३ व दि.१२.०५.२०२३ रोजीच्या पोहोच पावतीवर देखील श्री. श्रीकांत लक्ष्मण सावंत यांनी सही केल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदरचा साक्षीदार हा प्रस्तुत दाव्यात महत्वाचा साक्षीदार असल्याचे निदर्शनास येते. या कारणास्तव वादी मागणीप्रमाणे अर्ज मंजूर होऊन मिळणेस पात्र ठरतो. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

**-:: आदेश ::-**

१. नि.क्र.५२ वरील अर्ज मागणीप्रमाणे मंजूर करणेत येतो.

२. श्री. श्रीकांत लक्ष्मण सावंत यांस अर्जातील नमुद तळेखोल, गावठणवाडी, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग या पत्यावर, दि.०८.१०.२०२५ रोजी नेमल्या तारखेचे साक्षीसमन्स पाठविणेत यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदीत व उद्घोषीत केला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2025.09.17 16:13:18 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – १७.०९.२०२५. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) दोडामार्ग.